महाराष्ट्र शासन

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

**कार्यालय - जिल्हा समाज कल्याण अधिकारी,जिल्हा परिषद,बुलडाणा**

E-mail - samajkalyanzpbul@gmail.com Tel.Ph- 07262-242320

---

जा.क्र /बुजिप/सकवि/सेसयोजना/1915/2022 दिनांक - 14 / 11 /2022

प्रति,

गटविकास अधिकारी

पंचायत समिती------------------(सर्व)

विषय:- जिल्हा परिषद,बुलडाणा समाज कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणा-या २० % जि.प.सेसफंड योजनेच्या अर्जाबाबत.

संदर्भ:-

१. मा.समाज कल्याण विषय समिती सभा ठराव दिनांक ०९.०५.२०२२.
२. मा.सामान्य सभा ठराव दिनांक ०२.०८.२०२२ नुसार पुर्नविनियोजन बाबतचा प्रारुप ठराव
३. मा.समाज कल्याण विषय समिती सभा दिनांक २१.०६.२०२२ ठराव क्रमांक ०८
४. प्रशासकीय मान्यता आदेश क्रमांक सकवि/सेसयोजना/१८१९/२०२२ दिनांक १८.१०.२०२२.
५. तांत्रीक मान्यता आदेश क्रमांक सकवि/सेसयोंजना/१८२०/२०२२ दिनांक १८.१०.२०२२

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुशंगाने समाज कल्याण विभाग,जिल्हा परिषद,बुलडाणा अंतर्गत जिल्हा परिषदेच्या २० % जि.प.सेसफंड योजनेकरीता राखीव असलेल्या निधीमधुन ग्रामिण भागातील मागासवर्गीय महिला लाभार्थ्यांकरीता १०० टक्के अनुदानावर शिलाई मशीन व मागासवर्गीय शेतकऱ्याकरीता ५एचपी विद्युत मोटार पंप हया योजना राबविणे प्रस्तावित आहे.तरी सदर साहीत्याचे अर्जामध्ये नमुद अटी व शर्ती नुसार तपासणी करुन खात्री झाल्याशिवाय संबधीत लाभार्थ्यांचे अर्ज अर्जदार,ग्रामसेवक , विस्तार अधिकारी व गट विकास अधिकारी यांच्या स्वाक्षरी व मुळ कागदपत्रावरुन तपासणी करुन परीपुर्ण कागदपत्रासह प्राप्त करुन घ्यावे. प्राप्त झालेल्या अर्जामधुन पात्र अर्ज कार्यालयास दिनांक ०५.१२.२०२२ पर्यंत सादर करावे. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही व त्यामुळे लाभार्थी लाभापासुन वंचीत राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घेण्यात यावी.

सदर योजनेचे जास्तीत जास्त अर्ज प्राप्त होतील यादृष्टीने आपले स्तरावरुन योग्य ती कार्यवाही करावी तसेच ग्रामसेवकांना ग्रामस्तरावर सदर योजनेची प्रसिध्दी देणेबाबत आपल्या स्तरावरुन सुचना देण्यात याव्या. विहित मुदतीत पात्र अर्ज व याद्या (soft व hard copy सह) या कार्यालयास सादर करावे.

सहपत्र-अर्जाचा नमुना २

जिल्हा समाज कल्याण अधिकारी
जिल्हा परिषद,बुलडाणा

# सन २०२२-२३

**प्रति,**
**मा. जिल्हा समाज कल्याण अधिकारी,**
**जिल्हा परिषद, बुलडाणा**

मार्फत - गट विकास अधिकारी, पंचायत समिती ----------------------------------------------

विषय - समाज कल्याण विभागामार्फत मागासवर्गीय लाभार्थीकरिता १०० टक्के अनुदानावर ५ एच.पी.विद्युत मोटार पंप पुरविणे.

संदर्भ - १.शा.नि. क्रं. मागास/१०८९/प्रक.५३/३४/मंत्रालय, मुंबई, दि. २०/१०/९९ नुसार प्राप्त प्रस्ताव ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांनी गट विकास अधिकारी यांचे मार्फत प्रस्तावाची छाननी करून परिपुर्ण प्रस्तावाची नोंद रजिस्टरला घेवुन रजिस्टरसह विहीत मुदतीत मंजुरीस्तव सादर करावे.

२. नियोजन विभाग शासन निर्णय क्रं.डिटीसी २३१६/प्र.क्र.१३३/का.१४१७ दि.५ डिसेंबर २०१६

महोदय,

वरील विषयी सादर करण्यात येते की, श्री/श्रीमती ------------------------------------ राहणार ----------- ता. ------------------ जि. बुलडाणा येथील रहिवासी असुन जातीने ------------------- आहे. माझे २०२१-२२ वर्षातील वार्षिक उत्पन्न ------------------ आहे.

-----------------------------------------------------------------------------------------------------

## अर्जदाराची माहिती

१. अर्जदाराचे संपुर्ण नांव - ---------------------------------------------------------------------------

२. अर्जदाराचा संपुर्ण पत्ता - ---------------------------------------------------------------------------

३. वार्षिक उत्पन्न रू. - -------------------------------किंवा दारिद्ररेषेचा क्रमांक ----------------------

४. व्यवसाय - ------------------------- ५.भ्रमणध्वनी क्र. --------------------------------------

६. यापुर्वी लाभ घेतला आहे काय ? - होय / नाही

७. बँक पासबुक क्रमांक - -------- ------ ------------८.आधारकार्ड क्र. ------------------------------------

९. वय- ---------- १०.IFSC कोड-------------------११- बँक शाखेचे नांव ---------------------------------------

उपरोक्त माहिती सत्य असुन ती खोटी आढळुन आल्यास मी शिक्षेस व दंडास पात्र राहील.

आपला/आपली विश्वासू

स्वाक्षरी /अंगठा

## ग्रामसेवकाचा दाखला

श्री/श्रीमती -------------------------------------------------------- हे ------------------- येथील रहीवासी असुन मी त्यांना ओळखतो. त्यांनी यापुर्वी शासनाच्या कोणत्याही योजनेतुन या योजनेकरिता लाभ घेतलेला नाही. गट विकास अधिकारी, पंचायत समिती --------------------------- जि. बुलडाणा, सदरचा अर्ज परिपुर्ण असुन सादर करण्यात येत आहे/नाही.

दिनांक

ग्रामसेवक
ग्रामपंचायत ------------

## विस्तार अधिकारी यांचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती ------------------------------------------------ राहणार ----------- ता. ---------------- येथील रहीवासी असुन त्यांना दिलेली माहिती मुळ प्रमाणपत्रावरुन तपासण्यात आलीत. ती योग्य बरोबर आहेत. सबब अर्जदार या योजनेस पात्र राहील.

दिनांक

विस्तार अधिकारी सही व शिक्का
पंचायत समिती ---------------

---

## गट विकास अधिकारी पंचायत समिती यांचे प्रमाणपत्र

श्री/श्रीमती ---------------------------------- राहणार -------------------- पो. ------------- ता.----------- येथील रहीवासी असुन मी त्यांना ओळखतो त्यांनी मास्टर नोंदवही नुसार तपासनी केल्याप्रमाणे यापुर्वी शासनाच्या कोणत्याही योजनेतुन या योजनेकरिता लाभ घेतलेला नाही. याची मी खात्री केलेली आहे. सबब अर्जदार या योजनेस लाभ घेण्यास पात्र आहे.

दिनांक -

सहा.गट विकास अधिकारी
पंचायत समिती।-------------

गट विकास अधिकारी
पंचायत समिती ----------------

---

**अर्जासोबत जोडावयाचे कागदपत्र -**

१. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२७/अर्थबळ दि.०८ जुन २०२२ नुसार लाभार्थी यांचे आधार कार्ड हे बॅक अकाऊंट सोबत सलग्न असल्याची खात्री आपल्या स्तरावर करण्यात यावी व जे लाभार्थी यांचे आधार व बॅक अकाऊंट सलग्न नसतील तर त्यांचे अर्ज समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद,बुलडाणा येथे सादर करण्यात येऊ नये.
२. लाभार्थी मागासवर्गीय असल्याबाबतचा तहसिलदार/उपविभागीय अधिकारी यांचे जातीचे प्रमाणपत्र.
३. वार्षिक उत्पन्न रू.५०,०००/- चे आत असल्याबाबत तहसिलदार दाखला/दारिद्रय रेषेचे कार्ड .
४. ५ एच.पी.विद्युत मोटार पंपाकरीता जलसिंचनाची सुविधा असल्याबाबतचे प्रमाणपत्र .
५. ७/१२ व ८ अ नमुना जोडावा.
६. लाभार्थीचे वय १८ वर्षापेक्षा जास्त असावे किंवा ६० वर्षापेक्षा कमी असावे या बाबतचे सरपंच/ग्रामसेवक यांचा दाखला/टि.सी./आधार कार्ड ची छायांकित प्रत.
७. महाराष्ट्र शासन सार्वजानिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांक लोसंधो-२०००/प्र.क्र.५७/कुक-१ दिनांक ०९ मे २००० नुसार दिनांक १/५/२००१ पासून वैयक्तिक लाभाच्या योजना राबवितांना फक्त छोटे कुटुंब (२ जीवंत अपत्य) संकल्पना अवलंबिणाऱ्या जोडप्यांना लाभाकरीता पात्र समजण्यात येईल. फक्त छोटे कुटुंब (२ जीवंत अपत्य) असल्याबाबतचा पुरावा सोबत जोडावा.
८. आधार कार्ड छायांकित प्रत. सेल्फ अटेस्टेड करुन सलग्न करावे.
९. बँक पासबुकची झेरॉक्स प्रत .
१०. रहिवासी दाखला.
११. जिल्हा परिषद व पंचायत समिती अंतर्गत मागील तिन वर्षात (सन२०१९-२० ,२०२०-२१ व २०२१-२२) या वर्षात अंतर्गत लाभ घेतलेला लाभार्थ्यांनी लाभ घेतलेला नसावा यांची खात्री मास्टर नोंदवहीवरुन करुनच अर्ज पंचायत समिती यांनी समाज कल्याण विभागास सादर करण्यात यावे.
१२. वरील प्रमाणे सर्व अटी ची पुर्तता करुनच पात्र अर्ज सादर करावे अपात्र अर्ज सादर करण्यात येऊ नये अन्यथा स्थानिक निधी लेखा परिक्षा बुलडाणा यांच्याकडुन होणाऱ्या लेखा परिक्षणामध्ये काही आक्षेप आल्यास किंवा वसुली निघाल्यास संबधीत पंचायत समिती यांना सर्वस्वी जबाबदार धरण्यात येईल.व वसुली करण्यात येईल.

**टिप - सदर योजनेमधील लाभार्थी निवडी बाबतचा अधिकार समाज कल्याण विषय समितीला राहील.**